विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून
राहील आता दूर... तेही वर्षानुवर्षे
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे
नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरंटीने
लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827



दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com






सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २४८ वा | मंगळवार, दि. १२ मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# सोलापूरात एअरगन ठेवताना गंधकाचा भीषण स्फोट

## एक व्यक्ती गंभीर जखमी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापुरात एक धक्कादायक घटना घडली. एअरगन ठेवत असताना गंधकाचा भीषण स्फोट झाला. या स्फोटात एक व्यक्ती गंभीर जखमी झाला. या घटनेमुळे पपिसरात मोठी खळबळ उडाली.

स्फोटामुळे जखमी व्यक्तीच्या पायाच्या अक्षरशः चिधळ्या उडाल्या. या इसमाचे पाय छिन्नविछिन्न झाले. स्फोट झाल्यानंतर परिसरात मोठा आवाज झाला. यामुळे परिसरातील नागरिक रस्त्यावर आले. नागरिकांनी तातडीने पोलिसांना या घटनेची माहिती दिली. घटनास्थळी तातडीने पोलीस दाखल झाले. तसेच जखमी इसमाला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. या इसमावर सध्या उपचार सुरु आहेत. घटनेनंतर परिसरात बॉम्ब शोधक आणि नाशक पथक दाखल झाल्याचीदेखील माहिती समोर आली होती. या प्रकरणात आता काय-काय माहिती समोर येते ते पाहणं महत्त्वाचे असणार आहे.








सोलापूर शहरात भीषण स्फोट झाला आहे. सहारा एअरगन समोर स्फोटाची घटना घडली आहे. केदारनाथ सिद्धप्पा छत्रे (वय 53) असे जखमी इसमाचे नाव आहे. स्फोट इतका भीषण होता की आजूबाजूचा परिसर हादरला . केदारनाथ छत्रे इसमाचे पाय छिन्नविछिन्न झाले. प्राथमिक माहितीनुसार, गंधकाचे स्फोट झाले असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला आहे. सामाजिक कार्यकर्ते राज सलगर आणि इतर नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत, जखमी केदारनाथ छत्रे यांना शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.

### संपूर्ण घटना सीएसटीव्हीत कैद

सोलापूर शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या जुनी मिल कंपाऊंड परिसरातील शॉपिंग कॉम्प्लेक्सबाहेर सोमवारी दुपारी गंधकाच्या बॉक्सचा भीषण स्फोट झाला. 'सहारा गन हाऊस' या दुकानाच्या समोरच हा थरार घडल्याने संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. हा स्फोट इतका भीषण होता की, यामध्ये एक व्यक्ती गंभीर जखमी झाली असून, ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

### गंधकाने भरलेले बॉक्स ठेवताना स्फोट

जुनी मिल परिसरातील सहारा गन हाऊस या दुकानाच्या समोर उभ्या असलेल्या एका चारचाकी वाहनात गंधकाने भरलेला बॉक्स ठेवत असताना तो अचानक खाली पडला आणि मोठा स्फोट झाला. या दुर्घटनेत केदारनाथ छत्रे ही व्यक्ती गंभीर जखमी झाली असून, त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी खाजगी दवाखान्यात दाखल करण्यात आले आहेत. भरररस्त्यात झालेल्या या स्फोटामुळे परिसरात काही काळ दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.

---

## भाग्यश्री ॲग्रोकडून आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'ब्लू कुराकाओ' शीतपेयाचे लॉंच

### सर्व ग्राहकांसाठी आकर्षक योजना जाहीर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील स्थानिक उद्योगविश्वात नव्या संधींचे दार उघडत भाग्यश्री ॲग्रोने 'ब्लू कुराकाओ' या शीतपेयाचे दमदार लॉंच केले. आकर्षक चव, उच्च गुणवत्ता आणि परवडणारी किंमत यामुळे हे उत्पादन लवकरच ग्राहकांच्या पसंतीस उतरेल, असा विश्वास भाग्यश्री ॲग्रो कंपनीचे प्रमुख यशवंत देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

'ब्लू कुराकाओ' हे आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे आणि आंतरराष्ट्रीय मानकांचा विचार करून तयार करण्यात आले असून, गुणवत्ता व विश्वास या तत्त्वांवर आधारित आहे. स्थानिक पातळीवर तयार झालेले हे शीतपेय आता बहुराष्ट्रीय ब्रॅंड्सशी स्पर्धा करण्यासाठी सज्ज झाले आहे.

ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी भाग्यश्री ॲग्रोने विविध योजना जाहीर केल्या आहेत. कुपन योजनेंतर्गत अंदमान, लक्षद्वीप टूर, कॉर्डेलिया क्रूझ प्रवास, तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विमान प्रवास आणि रेल्वे तिकीट परतावा यांसारख्या सुविधा देण्यात येणार आहेत. सोलापूरहून गोवा, मुंबई, हैदराबाद आदी शहरांकडे प्रवास करणाऱ्या ग्राहकांना या योजनांचा लाभ मिळणार आहे.

सुरुवातीच्या टप्प्यात स्थानिक व्यापारी, हॉटेल, रेस्टॉरंट आणि किरकोळ विक्रेत्यांच्या माध्यमातून हे उत्पादन बाजारात उपलब्ध करण्यात येणार असून, लवकरच संपूर्ण महाराष्ट्रात वितरण वाढविण्याचे नियोजन आहे. भाग्यश्री ॲग्रोचे प्रमुख यशवंत लक्ष्मण देशमुख यांनी स्थानिक पातळीवर शिक्षण घेत विविध ठिकाणी कामाचा अनुभव घेतल्यानंतर उद्योजकतेचा मार्ग स्वीकारला. सातत्य, जिद्द आणि नव्या कल्पनांच्या जोरावर त्यांनी 'ब्लू कुराकाओ' या उत्पादनाद्वारे उद्योगविश्वात नवे पाऊल टाकले आहे.ह्लसोलापूरचा ब्रँड देशभरात पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे. नागरिक व माध्यमांचे सहकार्य मिळेल, अशी अपेक्षा देशमुख यांनी व्यक्त केली.

या पत्रकार परिषदेस केतन शहा उपस्थित होते.

---

## राज्यातील १११ शाळांना लागणार कुलूप?

### शेकडो विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यात अनधिकृत शाळांचे पेव फुटले असून, तब्बल ४८७ शाळा बेकायदेशीरपणे सुरू असल्याची बाब शिक्षण विभागाच्या नोंदीतून समोर आली आहे. यातील ७६ शाळांवर बंदीची कारवाई केली आहे. तसेच १११ शाळांविरोधात 'एफआयआर' दाखल केले असून, ३२५ शाळांवर दंडात्मक कारवाई केली आहे, अशी माहिती शिक्षण आयुक्त सच्चिंद्रप्रताप सिंह यांनी दिली.



प्रत्यक्ष दंड वसुली केवळ १६ प्रकरणांतच झाली असल्याचेही त्यांनी सांगितले.

हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात टाकणाऱ्या अनेक शाळांपैकी काहीच शाळांवर कारवाई करण्यात आली आहे. राज्यात सर्वाधिक अनधिकृत ३८९ शाळा मुंबई विभागात आढळल्या आहेत. त्यापैकी फक्त ५९ शाळा बंद करण्यात आल्या. तसेच १६ शाळांविरोधात एफआयआर दाखल केले असून, ३१० शाळांवर दंड आकारण्यात आला आहे. मात्र, वसुली केवळ पाच शाळांकडूनच झाली आहे. यावरून कडक कारवाई करण्यापेक्षा कागदी घोडेच अधिक नाचवले जात असल्याची चर्चा आहे.

नागपूर विभागात ११ पैकी चार शाळांवर बंदीची कारवाई झाली असून, सहा शाळांविरोधात एफआयआर दाखल केले आहेत. अमरावती विभागात चारपैकी एका शाळेवर कारवाई झाली आहे. विशेष म्हणजे नाशिक, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर विभागामध्ये अनधिकृत शाळा आढळून देखील बहुतांश ठिकाणी ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे अनधिकृत शाळांचे जाळे नेमके किती खोलवर रुजले आहे, याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

(पान 2 वर..)



## संपादकीय

# डिजिटल इंडियाची जनगणना

'आमची जनगणना, आमचा विकास' हे ब्रीद असणारी आणि स्वयंगणना करण्याची संधी देणारी जनगणना 1 मेपासून संपूर्ण भारतात सुरू झाली. जनगणना कशासाठी? तिचा राष्ट्राला, आपणाला काय लाभ?

जनगणना भारतात फार प्राचीन काळापासून सुरू होती. राजेरजवाड्यांच्या काळात आपापल्या राज्यातील मालमत्तेची मोजदाद करण्यासाठी जनगणना केली जात असे. त्यामुळे त्या राज्यातील महसूल गोळा करण्याच्या कामी जनगणनेची माहिती उपयोगी पडत असे. ख्रिस्तपूर्व 400 वर्षांपूर्वीच्या कौटिल्य अर्थशास्त्रामध्ये जनगणनेसंबंधी माहिती नमूद केली आहे. धारा (कर वसुली) गोळा करणार्यांनी किती कुटुंबांकडून धारा गोळा केला जाऊ शकेल व किती कुटुंबांकडून गोळा करता येणार नाही, याची नोंद घेण्यासाठी घरांची गणना करावी. तसेच किती शेतकरी, गुराखी, व्यापारी, दुकानदार, नोकर आहेत, प्रत्येक कुटुंबामध्ये किती तरुण आणि वृद्ध माणसे आहेत, त्यांचा व्यवसाय, उत्पन्न आणि खर्च ही माहिती गोळा करावी. इतकेच नव्हे, तर भटक्या जमातीतील लोकांच्या स्थलांतराची कारणे गोळा करावीत, अशा सूचना दिल्या होत्या.

लोकसंख्येच्या शास्त्रशुद्ध अभ्यासास सतराव्या शतकात लंडनमधील जॉन ग्रँट या शास्त्रज्ञापासून सुरुवात झाली, असे म्हणण्यास हरकत नाही. त्यांनी आपले सिद्धांत 'नॅचरल अँड पॉलिटिकल ऑब्झर्वेशन मेड अपॉन द बिल्स ऑफ मोरटॅलिटी इन लंडन' (1662) या पुस्तकामध्ये प्रसिद्ध केले. त्यात आयुर्मान सारणी कशी तयार करता येईल. याचा आराखडा दिला आहे. तसेच माल्थस यांनी 1798 मध्ये प्रसिद्ध केलेल्या आपल्या लोकसंख्या तत्त्वावरील निबंधात आर्थिक दृष्टिकोनातून जनगणनेचा अभ्यास केला होता. 1939 मध्ये अल्फ्रेड जे. लोटका यांनी जन्म, मृत्यू आणि लोकसंख्येची वयनिहाय विभागणी यामधील संबंध दाखविणारे सिद्धांत प्रस्थापित केले होते.

नियोजनबद्ध जनगणनेची सुरुवात 1872 मध्ये झाली, तर सार्वत्रिक स्वरूपाची जनगणना 1881 मध्ये झालेली दिसून येते. तेव्हापासून भारतात दर 10 वर्षांनी जनगणना केली जात आहे. 2027 मधील जनगणना ही भारतातील 16 वी जनगणना असून स्वातंत्र्योत्तर काळातील ही 8 वी जनगणना आहे. 15 ऑगस्ट 1947 रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 1951 मध्ये स्वतंत्र भारताची पहिली जनगणना झाली होती. 8 वी जनगणना दोन टप्प्यांत होणार असून, पहिला टप्पा यावर्षी (2026), तर दुसरा टप्पा 2027 मध्ये होणार आहे. पहिल्या टप्प्यात स्वयंगणना होणार आहे. यामध्ये भारतीय नागरिकांनी 1 मे ते 15 मे या कालावधीत sc.census.go.in या संकेतस्थळावर किंवा ॲपवर आपली माहिती भरायची आहे. माहिती भरल्यानंतर एस.सी.आय.डी. क्रमांक तयार होईल. त्यानंतर 16 मे ते 15 जून या कालावधीत प्रगणक प्रत्यक्ष घरामध्ये जाऊन माहिती घेतील. स्वातंत्र्योत्तर काळातील 7 जनगणना या दर दहा वर्षांनी नियमितपणे झाल्या. काही नैसर्गिक, तर काही तांत्रिक, मनुष्यनिर्मित अडचणींमुळे 8 वी जनगणना तब्बल 16 वर्षांनी होत आहे. विशेष म्हणजे, ही जनगणना 'डिजिटल जनगणना' म्हणून ओळख निर्माण करीत आहे. यामुळे माहिती संकलन अधिक जलद,अचूक आणि पारदर्शक होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. डिजिटल साक्षरतेचे प्रमाणही वाढण्यास मदत होत आहे.

एखाद्या जनसमूहाचा अभ्यास हा प्रामुख्याने पुढील पिढीमध्ये लोकसंख्येची पुनर्स्थापना कशी होईल, याविषयीचा अभ्यास असतो. व्यक्ती ही मर्त्य असली, तरी जनसमूह/समाज हा सतत अस्तित्वात असतो. म्हणजेच जनसमूहाचे घटकत्व नेहमी बदलत असते. प्रतिवर्षी काही बालके जन्माला येतात, तर काही माणसे मरतात. याशिवाय स्थलांतरानेही जनसमूहाच्या घटकांमध्ये निव्वळ वाढ अगर घट होऊ शकते. म्हणूनच लोकसंख्येतील वाढ, घट अगर आहे ती लोकसंख्या टिकून राहणे हे जननक्षमता, मृत्यू आणि स्थलांतर या तीन गोष्टींवर प्रामुख्याने अवलंबून असते आणि हा एक सोपा परंतु महत्त्वाचा असा निष्कर्ष जनगणनेतून मिळतो. जनगणनेमुळे देशातील लोकसंख्येची एकूण आकडेवारी, लोकसंख्यावाढीचे प्रमाण, वाढीचा वेग, घटीचा वेग, मृत्युदर, जन्मदर, लोकसंख्येची घनता, लोकसंख्येची व्यावसायिक विभागणी, शैक्षणिक माहिती, साक्षरता प्रमाण, लोकसंख्येची वयोगटानुसार, ग्रामीण व शहरी विभागणी, सरासरी आयुर्मान, लोकसंख्यावाढीचे आर्थिक विकासावरील परिणाम अशा अनेक महत्त्वाच्या घटकांची, बाबींची माहिती आकडेवारी उपलब्ध होते.

देशात आज अनेक समस्या आहेत; मात्र त्याचे मूळ काय? याचे उत्तर जनगणनेतील विविध निष्कर्षांतून बऱ्यापैकी मिळू शकते. अर्थात, त्यासाठी जनगणना निर्दोष असायला हवी. आकडेवारी चुकीची असली, तर उपाय कोणते? कसे? आणि कोण करणार? म्हणून जनगणनेसाठी प्रत्येकाने आपापली खरी आणि सविस्तर माहिती देणे, हेच आपणा सर्वांचे महत्त्वपूर्ण कर्तव्य आहे. देशातील उपलब्ध मनुष्यबळ, नोकरी, व्यवसाय, शिक्षण, घरबांधणी, शेती व अन्नविषयक गरजा, सार्वजनिक आरोग्य, कुटुंबनियोजन इत्यादी महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी धोरण आणि कार्यक्रम ठरविण्यासाठी जी माहिती आवश्यक असते, ती या जनगणनेतूनच उपलब्ध होते. राष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक योजनांमध्ये जनगणनेचे महत्त्व दिवसेंदिवस अधिकच वाढत आहे. 'आपली जनगणना, आपले भविष्य' हे 2011 च्या जनगणनेचे ब्रीद होते. खरोखरच आपली जनगणना हे आपले भविष्यच ठरते.

कारण, देशाची आर्थिक, सामाजिक, राजकीय, औद्योगिक घडी व्यवस्थित बसविण्यासाठी राज्यकर्ते व नोकरशहांना जनगणनेद्वारे संकलित केलेल्या माहितीचा उपयोग होतो. या माहितीआधारेच देशाच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा अचूकपणे तयार करता येतो. त्यामुळेच 2027 च्या जनगणनेचे ब्रीद 'आमची जनगणना, आमचा विकास' असे घेण्यात आले असावे. आज आपला देश जगात एक महासत्ता म्हणून उभारी घेत आहे. सर्व अंगांनी भारताची विकासाकडे घोडदौड चालू आहे.जगातील इतर महासत्ता भारताकडे भावी महासत्ता म्हणून पाहत आहेत. म्हणूनच जनगणना यशस्वी करणे हे सर्वच भारतीयांचे आद्य कर्तव्य आहे. जनगणनारूपी जगन्नाथाच्या रथास सर्वांचेच हात लागावेत, अशी अपेक्षा आहे. मग, चला तर आपली जबाबदारी पार पाडूया, जनगणनेत सहभागी होऊया!

पान १ वरून

## राज्यातील १११ शाळांना लागणार...

### पुणे विभागात ११ शाळा बंद

शिक्षण विभागाने अनधिकृत शाळांवर कारवाई सुरू केली असून, पुणे विभागात ६३ अनधिकृत शाळांपैकी ११ शाळा बंद केल्या आहेत. सात शाळांविरोधात एफआयआर दाखल केले आहे. तसेच दहा शाळांकडून दंड वसूल करण्यात आला आहे.

शिक्षण विभागाकडे सध्या उपलब्ध असलेली माहिती ही दोन ते तीन महिन्यांपूर्वीची आहे. त्यामुळे प्रत्यक्ष आकडेवारीत आणखी काही बदल होण्याची शक्यता आहे. राज्यातील कोणतीही अनधिकृत शाळा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करू नये, यासाठी शिक्षण विभाग गंभीरपणे काम करत आहे. अनधिकृत शाळांविरुद्धची मोहीम आणखी तीव्र करण्यात येणार असून, जिल्हानिहाय तपासणी वाढविण्यात येईल. तसेच पालकांना वेळेत माहिती मिळावी, यासाठी अनधिकृत शाळांची यादी वषार्तून दोनदा जाहीर करण्यात येईल. - सचिंद्रप्रताप सिंह, शिक्षण आयुक्त*

# सहसंवेदना : माणुसकीचा खरा आधार

मानवी शरीर आणि मन अत्यंत संवेदनशील असते. शरीराला काही टोचले, लागले, पोळले अथवा कापले तर डोळ्यांतून पाणी येते, वेदना होतात आणि माणूस तळमळतो. ही संवेदना अर्थातच शारीरिक असते. कोणी रागाने बोलले तर आपण नाराज होतो, कोणी अपमानित केले तर शरमून जातो, कोणी द्वेष केला तर आपण चिडतो, तर कोणी विचारपूस केली नाही तर त्या व्यक्तीबद्दल नाराजी व्यक्त करतो. या सर्व मनाच्या संवेदना आहेत. या आपल्या वैयक्तिक भावना आहेत.

परंतु दुसऱ्या एखाद्या व्यक्तीबाबत आपण हीच संवेदना बाळगतो का? यालाच ह्यसहसंवेदना' म्हणतात. दुसऱ्याच्या पायात काटा मोडला तर आपल्यालाही दुःख वाटते; त्या व्यक्तीबद्दल कळवळा निर्माण होतो. आपण पटकन धावत जाऊन त्याचा पाय आपल्या मांडीवर घेऊन हळुवारपणे काटा काढतो, तेव्हा ती सहसंवेदनाच असते. दुसऱ्याला होणाऱ्या वेदना आपण स्वतः अनुभवतो, तेव्हा खरी संवेदना प्रकट होते.

समाजात शांतता, सुख, समृद्धी आणि प्रेम निर्माण करणारी भावना म्हणजे सहसंवेदना होय. दुसऱ्याचे दुःख हे आपले दुःख मानणे म्हणजे सहसंवेदनशील होणे. समाजातील सर्वच लोक संवेदनशील नसतात; परंतु त्यांना संवेदनशील बनवण्याचे कार्य सद्प्रवृत्तीच्या लोकांनी केले पाहिजे.

हे वर्ष महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशतकीय जयंतीचे वर्ष आहे. सहसंवेदनेचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले होत. अस्पृश्य लोकांना पाण्यासाठी वनवण भटकावे लागत होते, हे पाहून १८६८ साली त्यांनी स्वतःच्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला करून दिला. संवेदनशीलता आपल्या कृतीतून व्यक्त करणारे महात्मा फुले अद्वितीय होते.

१८६३ साली महात्मा फुले यांनी 'बालहत्या प्रतिबंधक गृह' स्थापन केले. या गृहाच्या बाहेर त्यांनी अशी पाटी लावली होती की, 'फसलेल्या विधवांनी येथे खुशाल बाळंत होऊन जावे.' बालकांच्या निघृण हत्या थांबाव्यात, ही त्यांच्या मनातील सहसंवेदना होती आणि ती त्यांनी कृतीतून प्रकट केली. पुढे या गृहात एका विधवेला झालेल्या अनौरस मुलाला त्यांनी दत्तक घेतले व त्याचे नाव 'यशवंत' ठेवले. त्या मुलाने पुढे त्यांचा वारसा मोठ्या श्रद्धेने चालवला.

शेतकऱ्यांच्या कळवळ्याने महात्मा ज्योतिबा फुले यांनी नाडणूक आणि नागवणूक करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांवर आपल्या लेखणीतून आसूड ओढले. समाजातील सर्व थरांतील हीन-दीनांच्या उद्धाराची उत्कट तळमळ, त्यासाठी कोणताही धोका पत्करण्याची तयारी आणि बोलण्याप्रमाणे वागण्याचे धैर्य — हे सारे त्यांच्यातील प्रखर सहसंवेदनामुळेच होते.

येशू ख्रिस्त यांनीदेखील, 'मी या जगात सेवा करून घेण्यासाठी नव्हे, तर इतरांची सेवा करण्यासाठी आलो आहे,' असे म्हटले आहे. त्यांनी आपल्या शिष्यांना धर्मप्रबोधनासाठी पाठवताना सांगितले होते — 'रोग्यांना बरे करा, कुष्ठरोग्यांची शुश्रूषा करा, मृतप्राय झालेल्यांना संजीवनी द्या, पिशाच्चबाधितांची सुटका करा आणि सेवेच्या माध्यमातून लोकांची मने जिंकून त्यांना धर्मोपदेश करा.' यावरून त्यांनी आपल्या अनुयायांमध्ये सहसंवेदना जागृत करण्याचे कार्य केले होते, हे स्पष्ट होते.

'परोपकार हे पुण्य आणि परपीडा हे पाप' हा स्वतःमध्ये सहसंवेदना जागृत करण्याचा मूलमंत्र आहे. सहसंवेदना केवळ व्यक्ती-व्यक्तींमध्ये मर्यादित न राहता प्रत्येक सजीव प्राण्याबद्दल जागृत होणे आवश्यक आहे.

संत गाडगेबाबांची दशसूत्रीही सहसंवेदना जागृत करणारी आहे -

भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघड्यानागड्यांना वस्त्र, गरीब मुला-मुलींना शिक्षण, बेघरांना आसरा, अंध, पंगू व रोग्यांना औषधोपचार, बेकारांना रोजगार, पशू-पक्षी व मुक्या प्राण्यांना अभय, गरीब तरुण-तरुणींचे लग्न आणि दुःखी-निराशांना हिंमत.

हे सर्व देण्याची दानत एखाद्या व्यक्तीमध्ये सहसंवेदना जागृत झाल्याशिवाय निर्माण होऊ शकत नाही.

आज जगभरात युद्ध, भूकबळी, हिंसा, महिलांवरील अत्याचार आणि पशुहत्या वाढत आहेत. हे सारे थांबवायचे असेल, तर सहसंवेदनेची ज्योत प्रत्येक व्यक्तीच्या मनात प्रज्वलित करावी लागेल. कारण सहसंवेदनाच माणुसकीचा खरा पाया आहे.



**- किशोर जाधव,** सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

# सावित्रीच्या लेकिंचे प्रेरणादायी यश!

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. राज्याचा बारावीचा निकाल ८९.. ७९ टक्के लागला. नेहमीप्रमाणे कोकण विभागाने या निकालात बाजी मारली. कोकण विभागाचा ९४ . १४ टक्के निकाल लागला असून कोकण विभागाने राज्यात अव्वल स्थान पटकावले असून लातूर विभाग निकालात तळाशी राहिला आहे. लातूर विभागाचा निकाल ८४.१४ टक्के इतका लागला आहे. लातूर विभाग टक्केवारीत सर्वांचा मागे पडला हे या निकालातून स्पष्ट दिसते. मागील दशकात लातूर विभाग हा दहावी बारावीच्या निकालात सातत्याने अग्रस्थानी राहिला आहे. लातूर पॅटर्न हा दहावी बारावीच्या निकालासाठी राज्यात प्रसिद्ध होता. आताही नीट आणि जेईई परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांची पसंती लातूरलाच असते. नीट आणि जेईईची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांची पहिली पसंती पुणे, दुसरी पसंती लातूर तर तिसरी पसंती बारामती ही आहे. ज्यांना शक्य आहे ते पालक आपल्या पाल्यांना राजस्थानातील कोटा येथेही पाठवतात मात्र महाराष्ट्रात लातूर पॅटर्नने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली असताना लातूरची निकालात इतकी घसरण होणे हे आश्चर्यकारकच आहे. अर्थात निकालात घसरण फक्त लातूर विभागाची झाली असे नाही तर संपूर्ण राज्याचा निकाल यावर्षी घसरला आहे. यावर्षी राज्याचा निकाल ८९.७९ टक्के लागला. जो मागील वर्षीच्या तुलनेत २.०९ टक्क्यांनी कमी आहे. मागील वर्षी म्हणजे २०२५ साली बारावीचा निकाल ९१.८८ टक्के होता. यावर्षी बारावीचा निकाल का घसरला ? असा प्रश्न विचारला जात आहे. यावर्षी राज्य सरकारने कॉपी मुक्त परीक्षा अभियान राबवले त्यामुळे हा निकाल घसरला असण्याची शक्यता आहे. अर्थात हे चांगलेच झाले. कॉपीमुक्त परीक्षा या अभियानामुळे राज्याची खरी गुणवत्ता समोर आली. मध्यंतरी राज्याचा निकाल हा ९७ ते ९९ टाक्यांच्या दरम्यान असायचा आणि त्यात शेकडो विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण मिळायचे. सरकारने कॉपीमुक्त परीक्षा हे अभियान राबवल्या मुळे कॉपिला काही प्रमाणात आळा बसला आहे. सरकारने हे अभियान यापुढेही चालू ठेवावे. विद्यार्थ्यांनी कॉपिवर अवलंबून न राहता वर्षभर नियमितपणे अभ्यास करावा कारण काळ झपाट्याने बदलत आहे. आता शिक्षणातही तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. आज उत्तरपत्रिका शिक्षक तपासित आहेत पण भविष्यात या परीक्षांच्या उत्तरपत्रिका ए आय च्या मदतीने तपासल्या जातील. जेंव्हा ए आय तंत्रज्ञान वापरून उत्तरपत्रिका तपासल्या जातील तेंव्हा निकाल आणखी घसरण्याची शक्यता आहे. सोलापूर जिल्हा परिषदेचे तंत्रस्नेही शिक्षक दिसले गुरुजींनी गेल्या वर्षी त्यांच्या वर्गाच्या उत्तरपत्रिका ए आय तंत्रज्ञान वापरून तपासल्या. ए आय तंत्रज्ञानाने अवघ्या काही सेकंदात एक उत्तर पत्रिका तपासून होते हे त्यांनी दाखवून दिले त्यामुळे या तंत्रज्ञानाचा वापर भविष्यात उत्तर पत्रिका तपासण्याकरिता होणार हे नक्की त्यामुळे यापुढे विद्यार्थ्यांना अभ्यासाशिवाय गत्यंतर नाही. अर्थात राज्याचा एकूण निकाल घसरला असला तरी या निकालात मुलींनी नेहमीप्रमाणे बाजी मारली आहे. यावर्षी जवळपास ९३.१५ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलांपेक्षा मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण जवळपास ४ टक्क्यांनी अधिक आहे. मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८६.८० टक्के इतके आहे. केवळ बारावीतच नाही तर दहावीच्या परीक्षेतही मुलींनी बाजी मारली. दहावीच्या परीक्षेत ९४.९६ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या तर मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८९.५६ टक्के इतके आहे याचाच अर्थ बारावी प्रमाणे दहावीच्या परीक्षेतही मुलींनी बाजी मारली. अर्थात दहावी असो की बारावी निकालात कायम मुलीच बाजी मारत असतात हे आपण यावर्षीच नाही तर मागील अनेक वषार्पासून पाहत आहोत. निकालात मुलींनी बाजी मारणे ही नक्कीच अभिमानास्पद बाब आहे. परीक्षार्थी मुलींची संख्या कमी असूनही उत्तीर्ण होणाऱ्या मुलींचे प्रमाण जास्त असणे हे मोठ्या शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनाचे लक्षण आहे. सावित्रीच्या लेकिंची ही गरुड भरारी पाहून संपूर्ण महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावली आहे. एकेकाळी केवळ चूल आणि मूल इतकेच ज्यांचे जग होते त्या मुली आज गगनभरारी मारत आहेत. सावित्रीच्या लेकींचे हे यश निश्चितच प्रेरणादायी आहे. एकेकाळी ज्या मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते त्याच मुली आज शिक्षण व्यवस्थेचे सर्वात मोठे संचित बनू पाहत आहे. पुरोगामी महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे. कठोर परिश्रमाने मुलींनी हे यश मिळवले आणि इतरांना प्रेरणा दिली. कठोर परिश्रमातून मुलींनी हे यश मिळवून समाजाला एक सकारात्मक संदेश दिला आहे. दहाही, बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन आणि सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस मनापासून शुभेच्छा!



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# तलवार बाजीत अग्रेसर असलेली रूचिता कनकीला दहावीत 99 टक्के गुण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** इंडियन मॉडेल स्कूल ची विद्याथीर्नी रुचिता यलप्पा कनकी हीने दहावीच्या परीक्षेत 99 टक्के गुण मिळवून शाळेत तिसरी आली आहे. इंडियन मॉडेल स्कूलची विद्याथीर्नी असलेली रुचिताने खेळात देखील प्राविण्य मिळविले आहे. तलवारबाजी स्पर्धेत राज्य स्तरावर दुसरा क्रमांक मिळाला आहे. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षातील सहाय्यक लेखा अर्चना कनकी यांच्या त्या कन्या आहेत. जिद्द व चिकाटीचे जोरावर रुचिता ने खेळा बरोबर शैक्षणिक



गुणवत्तेत देखील आपला ठसा कायम ठेवला आहे. या शाळेचे विश्वस्त अमोल जोशी व सायली जोशी यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

# सार्वजनिक - खासगी भागीदारी तत्त्वावर एसटी उभारणार २०० चार्जिंग स्टेशन - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक



**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** एसटी महामंडळातील सर्व बसेस २०३५ पर्यंत ई-बसेसमध्ये रूपांतरित करण्याच्या दृष्टीने राज्य शासन आणि एसटी महामंडळाकडून वेगाने प्रयत्न सुरू आहेत. या अनुषंगाने आवश्यक असलेल्या चार्जिंग सुविधांची उभारणी करण्यासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर राज्यभरात किमान २०० चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार असून, यासाठी लवकरच निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्रालयीन दालनात आयोजित बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वित्तीय सल्लागार गिरीश देशमुख तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले की, २०३५ पर्यंत एसटीच्या सर्व बसेस ई-बसेस करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्या दृष्टीने भविष्यात सुमारे २० हजार ई-बसेससाठी आवश्यक चार्जिंग स्टेशन उभारणे ही काळाची गरज आहे. राज्यभरातील एसटी महामंडळाच्या उपलब्ध जागांवर नियोजित चार्जिंग स्टेशन उभारण्यासाठी ठराविक क्षेत्र संबंधित विकासकाला देण्यात येईल. त्या ठिकाणी विकासकाकडून आधुनिक चार्जिंग स्टेशन उभारण्यात येतील, जिथे एसटीच्या ई-बसेस चार्ज केल्या जातील.

यासोबतच सुमारे १५०० चौरस फूट जागा संबंधित विकासकाला भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्यात येणार असून, इतर वेळेत त्या चार्जिंग स्टेशनवर खासगी वाहनांनाही चार्जिंग सुविधा देण्यास परवानगी असेल. त्यामुळे एसटी महामंडळाला माफक दरात ई-बसेस चार्जिंगची सुविधा उपलब्ध होईल. तसेच विकासकाने वापरलेल्या जागेचे भाडे आणि खाजगी वाहनांच्या चार्जिंगमधून मिळणाऱ्या नफ्यातील ठराविक हिस्सा महसूल स्वरूपात एसटी महामंडळाला प्राप्त होणार आहे.

सार्वजनिक-खासगी भागीदारीतील प्रकल्पाची निविदा प्रक्रिया येत्या काही दिवसांत सुरू करण्यात येईल. त्यामुळे भविष्यात पर्यावरणपूरक ई-बसेसच्या दृष्टीने एसटी महामंडळ स्वयंपूर्ण होईल, असा विश्वासही मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

# प्रशासनाकडे टँकर मागणीचा प्रस्ताव आल्यानंतर 48 तासात मंजुरी प्रदान करावी - पालकमंत्री गोरे

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील कोणत्याही गावातून संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांच्याकडे टँकर मागणी चा प्रस्ताव आल्यानंतर त्यांनी 24 तासात प्रांत अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठवा व त्यानंतरच्या 24 तासात प्रशासनाने या प्रस्तावाला मान्यता प्रदान करावी. म्हणजे 48 तासात टँकर मागणी प्रस्तावावर प्रशासनाने निर्णय घेऊन मंजुरी प्रदान करावी, असे निर्देश पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित पाणीटंचाई कृती आराखडा आढावा बैठकीत पालकमंत्री गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, राज्यसभा खासदार ज्योती वाघमारे, आमदार सुभाष देशमुख, आमदार समाधान आवताडे, आमदार उत्तम जानकर, आमदार नारायण पाटील, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार अभिजीत पाटील, जिल्हाधिकारी कार्तिकियेन एस., मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल





जैन, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निराळी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उजनी धरणाचे अधीक्षक अभियंता सकृत खांडेकर, वीज वितरण कंपनीचे अध्यक्ष अभियंता सुनील माने यांच्या सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

सद्यस्थितीत जिल्ह्यात अक्कलकोट तालुक्यातील एक व माळशिरस तालुक्यातील चार गावांना टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे व पुढच्या काही कालावधीत तो 40 टँकर पर्यंत जाईल. तरी टंचाई कृती आराखड्यातील 24 तात्पुरत्या पाणीपुरवठा योजनाना मान्यता देण्यात येत असून कामे त्वरित सुरुवात करावी व जिल्ह्यात टंचाईची परिस्थिती उद्भवणार नाही यासाठी काटेकोरपणे नियोजन ठेवावे असे निर्देश श्री. गोरे यांनी यावेळी दिले. त्याप्रमाणेच उजनी धरणातून ऑगस्ट 2026 पर्यंत पिण्याच्या पाणी चे नियोजन करण्यात आलेले आहे. उजनी धरणातील पाणीसाठा मायनस मध्ये गेला असल्याने नवीन आवर्तने यातून देता येणार नाहीत. हे सर्व पाणी पिण्यासाठी आरक्षित असून सद्यस्थितीत पाणी वाटप मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

मंगळवेढा येथील भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना व अन्य पाणीपुरवठा योजनांसाठी तसेच एमजीपीच्या योजनांसाठी स्वतंत्र बैठक प्रशासनाने आयोजित करण्याबाबत पालकमंत्री श्री. गोरे यांनी सुचित केले. त्याप्रमाणेच पाणीपुरवठा योजनांना वीज वितरण कंपनीने वीज पुरवठा सुरळीत ठेवावा थकबाकी अभावी वीज पुरवठा खंडित होता कामा नये याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही यावेळी त्यांनी दिले.

यावेळी अधीक्षक अभियंता श्री खांडेकर यांनी उजनी धरणातील पाणीसाठ्याची माहिती दिली. धरणातील पाणीसाठा वृत्त असून सद्यस्थितीत 59 टीएमसी पाणीसाठा असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थित सर्व लोकप्रतिनिधी यांनी त्यांच्या मतदारसंघातील प्रादेशिक पाणीपुरवठा योजना तसेच अन्य पाणीपुरवठा योजना वीज पुरवठा सुरळीत सुरू ठेवण्याची मागणी करण्यात आली तसेच गावातून टँकरची मागणी झाल्यास पाहणी करून प्रशासकीय यंत्रणेने त्वरित टँकर सुरू करावा, अशीही मागणी करण्यात आली.

## वात्रटिका

### तीच दमदार शाई

कोणी फेकली कोणावर
काळे करण्यासाठी शाई...
फेकण्यापेक्षा लिहून करावा
निषेध,पण इथेच होते घाई...
बोलणार्याचे तोंड फेकीने
कधी बंद होत नसते...
अटकाव करते लिहून शाई
तीच खरी दमदार असते...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# जिल्ह्यात मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी – पालकमंत्री गोरे

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना ही शासनाची एक महत्त्वाची योजना असून आत्तापर्यंतच्या शेत रस्ते योजनेतील सर्वोत्तम योजना आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व लोकप्रतिनिधी व अधिकारी यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपला जिल्हा या योजनेत राज्यात अग्रेसर राहील यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.




नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेचा आढावा पालकमंत्री श्री. गोरे यांनी घेतला. त्याप्रसंगी ते मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार समाधान आवताडे, आमदार उत्तम जानकर, आमदार नारायण पाटील, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार अभिजीत पाटील, जिल्हाधिकारी कार्तिकियेन एस., मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी रोहयो अंजली मरोड यांच्या सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. गोरे म्हणाले की, मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ते योजने अंतर्गत पहिल्या टप्प्यात वाद नसलेल्या रस्त्यांचे सीमांकन करून घ्यावे. या रस्त्यांची कामे त्वरित सुरू करण्याच्या दृष्टीने कार्यवाही पूर्ण करावी. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात वाद असलेल्या रस्त्या अंतर्गत वाद मिटणारे तसेच वाद न मिटणारे रस्त्यांचे वर्गीकरण पूर्ण करावे. या योजनेअंतर्गत तालुकास्तरीय समितीचे अध्यक्ष संबंधित तालुक्याचे आमदार यांनी तालुकास्तरीय अधिकारी यांच्याशी चांगला समन्वय ठेवावा व या योजनेच्या कामाला अधिक गती द्यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

या योजनेअंतर्गत एक किलोमीटरच्या रस्त्यासाठी 15 लाख पर्यंतचा खर्च प्रस्तावित करण्यात आलेला आहे. जिल्ह्यात या योजनेच्या कामांना निधीची कमतरता नाही त्यामुळे सर्वांनी वाद नसलेल्या रस्त्याच्या कामांना प्राधान्य देऊन तात्काळ कामे सुरू करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत असेही सूचना पालकमंत्री श्री. गोरे यांनी दिल्या. त्याप्रमाणेच काही तांत्रिक अडचणी आल्यास त्या सोडवल्या जातील असेच सांगितले.

महसूल व वन विभागामार्फत ही योजना 14 डिसेंबर 2025 रोजी सुरू करण्यात आली असून शेतकऱ्यांना शेतमाल वाहतुकीसाठी मजबूत व सुलभ रस्ते उपलब्ध करून देणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेत शेतरस्ते व पाणंद रस्त्यांचा समावेश असून एका किमी साठी कमाल 15 लाख रुपये खर्च करता येणार आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी चर खोदून मुरुम टाकून दबाई केली जाणार असून आवश्यक ठिकाणी सिमेंट पाईप बसवले जातील. योजनेसाठी राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व विधानसभा क्षेत्रस्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. तसेच जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष पालकमंत्री असून जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक आदी अधिकारी सदस्य आहेत, अशी माहिती उपजिल्हाधिकारी रोहयो अंजली मरोड यांनी दिली.

जिल्हा भूमी अभिलेख अधीक्षक श्री. घोडके यांनी जिल्ह्यातील 4911 शेत/पानंद रस्त्याची यादी प्राप्त झालेली असून त्यातील 372 रस्त्यांचे सीमांकन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. उर्वरित रस्त्यांच्या सीमाकानाची कार्यवाही वेगाने सुरू असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील एक आठवड्याच्या एफडीपीचा उत्साहात समारोप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य प्राध्यापक विकास अकादमी (MSFDA) यांच्या पुढाकारातून एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या एक आठवड्याच्या 'प्राध्यापक विकास कार्यक्रम' (FDP) चा शुक्रवारी उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. 'क्षमता उजागर करणे : रसायनशास्त्र शिक्षणतज्ज्ञांना सशक्त बनविणे' या विषयावर आधारित हा उपक्रम दि. ४ ते ८ मे २०२६ या कालावधीत पार पडला. राज्यभरातील प्राध्यापक, संशोधक व शिक्षणतज्ज्ञांनी या कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



समारोप समारंभास प्रभारी कुलगुरू तथा प्र-उपकुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा प्रमुख उपस्थित होते. यावेळी कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, ज्येष्ठ संशोधक डॉ. एस. एच. पवार, डॉ. ए. ए. घनवट, प्रा. के. एस. पाटील यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक व सहभागी शिक्षक उपस्थित होते.'क्षमता उजागर करणे : रसायनशास्त्र शिक्षणतज्ज्ञांना सशक्त बनविणे' या विषयावर आधारित हा उपक्रम दि. ४ ते ८ मे २०२६ दरम्यान एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथे होत आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन पद्मश्री प्रो. गणपती यादव यांच्या हस्ते झाले होते.

कार्यक्रमात पॉलिमर सायन्स, केमिकल इंजिनिअरिंग, इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी, इंडस्ट्री 4.0, संशोधन प्रकाशन व नीतिमत्ता, पेटंट प्रक्रिया, आधुनिक ICT साधनांचा वापर, विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, तसेच सोलापूरच्या वस्त्रोद्योगाचे भविष्य अशा विविध विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. सीएसआयआर-राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (CSIR-NCL), पुणे येथील वरिष्ठ वैज्ञानिकांसह विविध विद्यापीठांतील मान्यवर प्राध्यापकांनी सत्रांमध्ये सहभाग नोंदविला.

समारोप प्रसंगी बोलताना डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी सांगितले की, 'हा एफडीपी अत्यंत चांगल्या पद्धतीने पार पडला असून सहभागी शिक्षकांकडून उत्कृष्ट प्रतिसाद आणि सकारात्मक फीडबॅक मिळाला आहे. विद्यार्थी हित समोर ठेवून अशा उपक्रमांचे आयोजन करणे ही काळाची गरज आहे. या माध्यमातून प्राध्यापकांच्या ज्ञानात व संशोधन क्षमतेत निश्चितच भर पडेल.'

कार्यक्रमादरम्यान संशोधनातील नव्या दिशा, उद्योग-शिक्षण समन्वय, बौद्धिक संपदा हक्क आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अध्यापनातील वापर याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. तसेच प्रयोगशाळांमधील 'लॅब सेफ्टी' चे महत्त्वही विशेष अधोरेखित करण्यात आले.

एफडीपीमध्ये सहभागी झालेल्या प्राध्यापकांनी कार्यक्रमाबाबत समाधान व्यक्त करत सकारात्मक अभिप्राय नोंदविला. समारोपावेळी सर्व सहभागी शिक्षकांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल आयोजकांचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. सोलापूरच्या शैक्षणिक वातावरणाला नवी दिशा देणारा हा उपक्रम ठरल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. मानसी जाधव यांनी केले.

# उ. वडगावचा सुपुत्र रोहित गाडे यांची उपनिरीक्षक पदी निवड

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** करमाळा तालुक्यातील उ. वडगाव येथील सुपुत्र रोहित बाळू गाडे यांनी नुकत्याच जाहीर झालेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन करत 'पोलीस उपनिरीक्षक (PSI)' या मानाच्या पदावर झेप घेतली आहे. त्यांच्या या यशामुळे उ. वडगाव गावाचा नावलौकिक उंचावला असून संपूर्ण परिसरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

साध्या कुटुंबातून आलेल्या रोहित गाडे यांनी जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर हे यश मिळवले आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा, जगदाळे वस्ती येथे इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंत झाले. त्यानंतर ५ वी ते ७ वी पर्यंतचे शिक्षण उ. वडगाव येथे पूर्ण केले. विशेष म्हणजे ८ वी ते १० वी चे शिक्षण घेत असताना त्यांनी आपल्या मामाकडे राहून अण्णासाहेब जगताप विद्यालय, करमाळा येथे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातून पदवी शिक्षण पूर्ण केले.

पदवी शिक्षण घेत असताना त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉस्टेल, करमाळा येथे राहून अभ्यास केला. या काळात हॉस्टेलचे सुभाष भोसले सर यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य त्यांना लाभले. तसेच त्यांचे मामा आणि सामाजिक कार्यकर्ते प्रमोद कांबळे यांचेही मोलाचे पाठबळ त्यांच्या यशामागे आहे.



रोहित गाडे यांचा प्रवास प्रेरणादायी आहे. २०१७ साली पहिल्याच प्रयत्नात त्यांची पोलीस कॉन्स्टेबल म्हणून पुणे ग्रामीण येथे निवड झाली होती. नोकरी सांभाळत त्यांनी अभ्यास सुरू ठेवला आणि २०२३ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या विभागीय परीक्षेत (Departmental Exam) उत्तीर्ण होत PSI पदावर निवड मिळवली.

रोहित गाडे यांच्या या नेत्रदीपक यशामुळे उ. वडगाव गावासह करमाळा तालुक्याचा अभिमान उंचावला आहे. त्यांच्या या यशाने ग्रामीण भागातील युवकांसमोर नवा आदर्श निर्माण केला असून 'मेहनत आणि चिकाटी असेल तर यश नक्की मिळते' हा संदेश त्यांनी कृतीतून दिला आहे.

त्यांच्या यशाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, मित्रपरिवार तसेच ग्रामस्थांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. रोहित गाडे यांचे हे यश अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# कोकणचा विकास हा महाराष्ट्राच्या विकासाचा कणा – उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

**रायगड :** रोहा शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या विविध विकासकामांचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते आज पार पडले. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

डॉ. सी. डी. देशमुख सभागृह, रोहा येथे आयोजित कार्यक्रमास खासदार सुनील तटकरे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, रोहा-अष्टमी नगर परिषद नगराध्यक्षा



वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, सभापती विजया पाशिलकर, उपसभापती संजय मांडलुस्कर, मुरुड नगराध्यक्षा दांडेकर, मुख्याधिकारी अजयकुमार एडके आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, विकास म्हणजे केवळ सिमेंटच्या इमारती अथवा रस्ते नव्हे, तर सामान्य नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणणे होय. श्रद्धा, संस्कृती, पर्यावरण, पर्यटन आणि रोजगार यांचा समतोल राखून विकास साधण्यास शासन प्राधान्य देत आहे. कोकणातील नागरिक मेहनती, प्रामाणिक व कष्टाळू असून कोकणाचा विकास हा महाराष्ट्राच्या प्रगतीचा भक्कम पाया असल्याचे त्यांनी सांगितले.

रायगड ही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाची पावन भूमी असून सामाजिक समतेचा इतिहास घडविणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाड चवदार तळे सत्याग्रहाचीही ही भूमी आहे. कोकण हा निसर्गसंपन्न, सांस्कृतिक वैभव लाभलेला प्रदेश असून येथील विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.

रोहा-अष्टमी नगर परिषद हद्दीतील कुंडलिका नदीकाठावर विविध ठिकाणी पुरसंरक्षक भिंती बांधणे, कुंडलिका नदी संवर्धन गार्डन येथे खाऊ गल्ली विकसित करणे, जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स यांनी तयार केलेले शिवसृष्टी शिल्प उभारणे, धावीर महाराज मंदिर येथे भक्तनिवास नूतनीकरण करणे तसेच स्वर्गीय दत्ताजीराव ग. तटकरे ब्लड बँक विकसित करणे आदी विविध विकासकामांचे भूमिपूजन यावेळी करण्यात आले.

# सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये महाराष्ट्र दिन व कर्मचारी दिन उत्साहात साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय तसेच सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, केगाव येथे महाराष्ट्र दिन व कामगार (कर्मचारी) दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या हस्ते तिरंगा ध्वज फडकावण्यात आला. यावेळी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे, सीआरटीएडचे संशोधन संचालक व ज्येष्ठ संशोधक एस. एच. पवार, पब्लिक स्कूलच्या प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, निखहत शेख, मुख्य प्रबंधक डॉ. डी. आय. नवले यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



महाराष्ट्र दिनानिमित्त विविध मान्यवरांनी महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेचा गौरव करत कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. संस्थेच्या प्रगतीत कर्मचारी वर्गाचे योगदान महत्त्वाचे असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. यावेळी विविध प्रवर्गातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा 'बेस्ट एम्प्लॉयी ऑफ द इयर' सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करताना कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी, 'प्रामाणिकपणा, समर्पण आणि उपक्रमशीलतेच्या जोरावर संस्थेची उंची वाढते. पुरस्कार विजेत्या कर्मचाऱ्यांचा इतरांनी आदर्श घ्यावा,ह्व असे प्रतिपादन केले. यावेळी पुरस्कारप्राप्त कर्मचाऱ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमात संस्थेतील सेवाभाव, शिस्त आणि कार्यनिष्ठा यांचा विशेष उल्लेख करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संस्थेच्या प्रतिनिधींनी केले. संपूर्ण परिसरात राष्ट्रभक्ती व गौरवाचे वातावरण निर्माण झाले होते.

**हे गुणवंत कर्मचारी**

- उपक्रमशील विशेष कामगिरी : जुवेरिया शेख
- शिपाई प्रवर्ग : मनोज सलगर
- मावशी प्रवर्ग : करिष्मा मुलानी, अरुणा शिंदे
- बस चालक प्रवर्ग : नूर शेख
- वसतिगृह अधीक्षक प्रवर्ग : सिंधू पोळ
- शिक्षकेतर कर्मचारी प्रवर्ग : विनायक नाळे
- कार्यालयीन कर्मचारी प्रवर्ग : रामकृष्ण लांबतुरे (जनसंपर्क अधिकारी)
- शिक्षक कर्मचारी प्रवर्ग : शशिकांत लामकाने, (अभियांत्रिकी महाविद्यालय) राजू ठाकूर (पब्लिक स्कूल अँड ज्यूनिअर कॉलेज)
- १०० टक्के उपस्थिती पुरस्कार : गोपाळ भारत नलवडे, स्मिता नवले, शाहीन शेख (मुख्याध्यापिका)

## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## जाहिर प्रसिध्दीकरण

अर्ज क्र. १६८/२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब,यांचे कोर्टात**

श्रीपाद धिरोत्तम देशपाडे } अर्जदार

**विरूध्द**

मुख्याधिकारी, मोहोळ नगरपरिषद, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर. } सामनेवाला

ज्याअर्थी, अर्जदाराचे आजोबा-खंडेराव दत्तात्रय देशपांडे हे दि.२१/१२/२००१ रोजी रोजी मरण पावले आहेत. त्यांच्या मृत्यूची नोंद मोहोळ येथील नगरपरिषद कार्यालयामध्ये मृत्यू तारखेपासून एक महिन्याच्या आत करणे आवश्यक असल्याची माहिती व जाणीव अर्जदारांना नव्हती. त्यामुळे सदरची नोंद करण्याचा आदेश नगरपरिषद मोहोळ यांना व्हावा अशी मागणी अर्जदाराने मे. कोर्टामध्ये सदरचा अर्ज दाखल करून केलेली आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस सदर प्रसिध्दीकरणाव्दारे कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे खंडेराव दत्तात्रय देशपांडे यांचा दि.२१/१२/२००१ रोजी झाल्यामुळे त्यांच्या मृत्यूची नोंद मोहोळ नगरपरिषदच्या रेकॉर्ड मध्ये घेण्यास कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपली तक्रार/ हरकत स्वतः अगर वकीलामार्फत या मे. कोर्टात सादर करावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास कायदेशीर बाबींचा विचार करून मुख्याधिकारी, नगर परिषद, मोहोळ यांना खंडेराव दत्तात्रय देशपांडे हे दि.२१/१२/२००१ रोजी मरण पावल्याची नोंद घेण्याचा आदेश करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दि.११/०५/२०२६

सही/-
लिपीक (शिक्का) तहसिलदार,मोहोळ.

## जाहिर प्रसिध्दीकरण

अर्ज क्र.२४८/२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब,यांचे कोर्टात**

बालाजी हरी अनुसे } अर्जदार

**विरूध्द**

मुख्याधिकारी, मोहोळ नगरपरिषद, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर. } सामनेवाला

याअर्थी अर्जदार-बालाजी हरी अनुसे याचा जन्म दि.२१/०३/२००० रोजी झाला आहे. त्याच्या जन्माची नोंद मोहोळ येथील नगरपरिषद कार्यालयामध्ये जन्म तारखेपासून एक महिन्याच्या आत करणे आवश्यक असल्याची माहिती व जाणिव अर्जदारास नव्हती. त्यामुळे सदरची नोंद करण्याचा आदेश मोहोळ नगरपरिषद मोहोळ यांना व्हावा अशी मागणी अर्जदाराने मे. कोर्टामध्ये सदरचा अर्ज दाखल करून केलेली आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस सदर प्रसिध्दीकरणाव्दारे कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे बालाजी हरी अनुसे याचा जन्म दि.२१/०३/२००० रोजी झाल्यामुळे त्याच्या जन्माची नोंद मोहोळ नगरपरिषदेचे रेकॉर्ड मध्ये घेण्यास कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपली तक्रार/हरकत स्वत: अगर वकीलामार्फत या मे. कोर्टात सादर करावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास कायदेशीर बाबींचा विचार करून मुख्य कार्यकारी अधिकारी नगर परिषद मोहोळ यांना बालाजी हरी अनुसे याचा जन्म दि.२१/०३/२००० रोजी झाल्याची नोंद घेण्याचा आदेश करण्यात येईल, त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दि.११/०५/२०२६

सही/-
लिपीक (शिक्का) तहसिलदार,मोहोळ.

## जाहिर प्रसिध्दीकरण

क्र. अभि/कावि नं. २६८/२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब,यांचे कोर्टात**

श्री.महादेव दिनकर मस्के, वय-५२वर्षे,धंदा-शेती, रा.नांदगाव, ता.मोहोळ,जि.सोलापूर } अर्जदार


**विरूध्द**

ग्रामपंचायत नांदगाव, ता.मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत नांदगाव,यांचेवर बजावविण्यात यावी.) } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराचा नातु म्हणजेच संकल्प संदीप जाधव याचा जन्म ता.१५/०५/२०१५ रोजी मौजे नांदगाव, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा नातू म्हणजेच संकल्प संदीप जाधव याची जन्म दाखल्याची ता.१५/०५/२०१५ रोजीप्रमाणे मागणी वरील नमुद तारखेनुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे मे २०१५ चे अभिलेखात अर्जदाराचा नातू म्हणजेच संकल्प संदीप जाधव याची जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२९/०५/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे.कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता.११/०५/२०२६ हुकुमावरुन

सही/-
लिपीक (शिक्का) तहसिलदार,मोहोळ.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) लगेच उत्तर देणारा, वेळ न दवडता उत्तर देणारा २) धनी ३) सन उलट लिहा ४) सर्कशीतील विदूषक, पत्त्यातील एक पान ५) अंगावरील छोटा काळा ठिपका ६) पावा, मुरली ७) दुर्ग, किल्ला ८) महाराष्ट्रातील एक देशपातळीवरील नेते १२) लोकांचा समूह १३) हाताच्या चपळतेने फसविणे, ***** करणे १५) मोठे, उज्वल असे यश १६) एक रास २३) कमा उलट लिहा २५) राज्याचे माजी मुख्यमंत्री, सध्या केंद्रीय मंत्री- **** राणे २६) टीव्ही सिरीयल निर्माती- *** कपूर २७) याची धाव कुंपणापर्यंत अशी एक म्हण आहे २८) बे दुणे ३१) साईबाबांचा एक संदेश- *** मालिक एक ३२) लाकडाचे गोदाम ३३) मावशीचा मुलगा ३४) आ. नितेश राणे यांचा मतदारसंघ ३५) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ३७) तल्लीन, मग्न होणे ३९) जंगल, अरण्य ४३) एकाग्र, मग्न होणे ४४) एक अभिनेते- *** दामले ४६) फळातील गोड द्रव ४८) सूर्य (इंग्रजीत)

**आडवे शब्द :** १) श्रीरामाचा परमभक्त, वायुपुत्र ४) कोल्हापूर जिल्ह्यातील एक प्रसिध्द दैवत ७) श्री गजाननाचे एक नाव ९) लहान बाळाला ही टोचतात १०) मंदिराच्या शिखरावर हा बसवितात ११) परीट, धोबी १३) पराजय, जीतच्या विरूध्दार्थी १५) रांग १६) दम उलट लिहा १७) खर्चच्या विरूध्दार्थी १८) चार आणि तीन मिळून होणारी संख्या १९) आमीर खान अभिनीत एक चित्रपट-* इडियटस् २०) विश्वचषक (इंग्रजीत) २१) चाळीस आणि बारा मिळून होणारी संख्या २२) एक पेय, टी (मराठीत) २३) एक मराठी महिना २४) याच्यापासून शिरा बनवितात २५) गटर २६) सात गुणिले तीन २९) रक्षाबंधनवेळी बहीण भावाला बांधते ती ३०) एक जंगली हिंस्त्र पशु ३२) लग्नातील नवऱ्या मुलाची आई ३४) रांग, लाईन (हिंदीत) ३६) या कंपनीचे च्यवनप्राश प्रसिध्द आहे ३८) उन्हातान्हात भटकणे, **** फिरणे ४०) एक म्हण- दाम करी ** ४१) श्रीमंत (हिंदीत), शाहरूखचा एक हिंदी चित्रपट ४२) बनावट ४४) रयत, जनता, एक म्हण- जसा राजा तशी ** ४५) बोझा, वजन ४७) एक (इंग्रजीत) ४८) उत्सवाचा दिवस ४९) पर्जन्य ५०) निवडणुकीत उमेदवाराला मत देणे

## सुडोकु - 248

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | | | | | 7 | | | |
| | 5 | 1 | | 9 | 4 | 7 | 2 | |
| 4 | | 3 | | | | 8 | | |
| 6 | 8 | | | 2 | 3 | 4 | 7 | |
| | 3 | 4 | 5 | | | 1 | 6 | |
| 2 | 1 | | | | 6 | 5 | | |
| | | | 4 | | 2 | | 1 | |
| | 4 | 2 | | 5 | | 6 | | |
| 1 | 9 | 7 | | | | 2 | 5 | |

# खा. प्रणिती शिंदे यांच्यावरील अवमानकारक वक्तव्याबद्दल पालकमंत्री गोरे यांनी माफी मागावी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्याविषयी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केलेल्या अवमानकारक वक्तव्याचा निषेध करत, त्यांनी तात्काळ जाहीर माफी मागावी, अशी मागणी काँग्रेस व महाविकास आघाडीच्या महिला नेत्यांनी आज पत्रकार परिषदेत केली.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या महिला आघाडीच्या प्रमुख प्रिया बसवंती यांनी या प्रकरणाचा तीव्र निषेध नोंदवला. त्या म्हणाल्या की, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे इथे स्त्रियांना सन्मानाने वागविले जाते. पण सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्याविषयी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी खासदार प्रणिती शिंदे ह्या केवळ राहुल गांधी यांच्या घरासमोरील रस्त्याचा विचार करतात असे आक्षेपार्ह, अवमानकारक वक्तव्य केले. त्यांचे हे वक्तव्य महिला सन्मानाला धक्का देणारे आहे. सोलापूरच्या महिला हा अवमान सहन करणार नाहीत. महिलांचा सन्मान हा केवळ राजकीय घोषवाक्याचा विषय नसून तो



कृतीतून दिसला पाहिजे; अन्यथा 'नारी शक्ती वंदना' ही घोषणा केवळ शब्दांपुरतीच मर्यादित राहील. म्हणून पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पुढील दहा दिवसांत खासदार प्रणिती शिंदे यांची जाहीर माफी मागावी. अन्यथा काँग्रेस, शिवसेना आणि महाविकास आघाडीच्या महिला कार्यकर्त्या रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करतील.

पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेसच्या सरचिटणीस संघमित्रा चौधरी यांनीही सांगितले की, भाजप महायुती सरकारच्या कार्यकाळात राज्यात महिला, तरुणी आणि चिमुकल्यांवरील अत्याचारांच्या वाढत्या घटनांमुळे महाराष्ट्रातील जनतेत अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा संवेदनशील काळात राज्यकर्त्यांनी महिलांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे अपेक्षित असताना विरोधकांवर वैयक्तिक आणि अवमानकारक टीका करण्याची प्रवृत्ती चिंताजनक आहे. रस्त्याच्या निधीच्या मुद्द्यावरून पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी खासदार प्रणिती शिंदे यांच्याबाबत केलेले वक्तव्य अत्यंत दुर्दैवी, निषेधार्ह आणि महिलांच्या सन्मानाला धक्का देणारे आहे. हा केवळ एका महिला खासदारांचा अपमान नसून समस्त नारीशक्तीचा अवमान आहे. जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणाऱ्या महिला लोकप्रतिनिधींविषयी सत्ताधाऱ्यांच्या मनात एवढा आकस का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. संघमित्रा चौधरी पुढे म्हणाल्या की, एखाद्या महिला लोकप्रतिनिधीच्या कार्यावर राजकीय टीका करण्याऐवजी त्यांच्या प्रतिमेला धक्का पोहोचेल अशा स्वरूपाची विधाने करणे ही अत्यंत खालच्या पातळीची राजकीय संस्कृती आहे. एकीकडे भाजपकडून 'नारी शक्ती वंदना' आणि महिला सन्मानाच्या घोषणा दिल्या जातात; मात्र दुसरीकडे महिलांविषयी अवमानकारक भाषा वापरली जाते, हा स्पष्ट दुटप्पीपणा असल्याचा आरोप त्यांनी केला.

या पत्रकार परिषदेस महिला काँग्रेसच्या महिला शहर अध्यक्षा प्रमिला तुपलवंडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या दक्षिण अक्कलकोट महिला आघाडी जिल्हाप्रमुख प्रिया बसवंती, उत्तर मध्य महिला आघाडी जिल्हाप्रमुख मंगल थोरात, महिला आघाडी शहर प्रमुख स्वातीताई रूपनर, युवती सेना शहर प्रमुख रेखाताई आडकी, काँग्रेसच्या महिला सरचिटणीस ॲड संघमित्रा चौधरी, माजी अध्यक्षा हेमाताई चिंचोलकर, माजी नगरसेविका भारतीताई ईप्पलपल्ली, सचिव शुभांगी लिंगराज यांच्यासह इतर महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

# चिमुकल्याच्या मदतीसाठी शिखर पहारिया फाउंडेशन धावले


## हृदय शस्त्रक्रियेसाठी मुंबईकडे रवाना

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सैफुल परिसरातील बसवराज जवळगे यांच्या अवघ्या चार दिवसांच्या चिमुकल्या बाळाला हृदयाशी संबंधित गंभीर आजार असल्याचे निदान डॉक्टरांनी केले असून तातडीच्या शस्त्रक्रियेची गरज व्यक्त करण्यात आली आहे. या नाजूक अवस्थेत बाळाला पुढील उपचारासाठी मुंबई येथे हलविण्यात आले आहे.

अत्यंत कठीण आणि चिंताजनक परिस्थितीत कुटुंबावर मोठा मानसिक व आर्थिक ताण निर्माण झाला असताना, माणुसकीचा हात पुढे करत शिखर दादा पहारिया यांनी मदतीचा आधार दिला आहे. या निरागस जीवाचे प्राण वाचवण्यासाठी त्यांनी तत्काळ सहकार्य करत कुटुंबाला दिलासा दिला आहे.

सामाजिक बांधिलकी जपत गरजूंच्या मदतीसाठी सदैव तत्पर असणारे शिखर दादा पहारिया हे अशा प्रसंगी अनेकांसाठी आधारवड ठरत आहेत. त्यांच्या या सहकार्यामुळे जवळगे कुटुंबाला मोठा धीर मिळाला असून, बाळाच्या उपचारासाठी आवश्यक असलेली मदत मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

दरम्यान, संबंधित डॉक्टरांच्या





देखरेखीखाली मुंबईत बाळावर आवश्यक वैद्यकीय उपचार सुरू करण्यात येणार असून, बाळाच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी यासाठी सर्वत्र प्रार्थना व्यक्त होत आहे.

मानवी मूल्ये जपणाऱ्या अशा संवेदनशील मदतीमुळे समाजात सकारात्मकतेचा संदेश पसरत असून, संकटाच्या काळात एकमेकांच्या पाठीशी उभे राहण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे.

या बाळाला लागणाऱ्या उपचाराची माहिती रुग्णसेवक आशम फुलमामडी यांनी दिल्यानंतर शिखर पहारिया फाउंडेशनच्या माध्यमातून ही मदत केली.

# ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने बावनकुळे यांचा विशेष सन्मान



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे हे रविवारी सोलापूर शहराच्या दौऱ्यावर आले असता ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. ईच्छा भगवंताची परिवाराचे मार्गदर्शक तथा सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ चे भाजप नगरसेवक किसन जाधव यांच्या पुढाकारातून अशोक चौक परिसरातील स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यानासमोर हा सत्कार सोहळा पार पडला. यावेळी नामदार बावनकुळे यांना सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर यात्रेतील प्रमुख आकर्षण असलेल्या सातही मानाच्या नंदीध्वजांचे प्रतीक असलेली बाराबंदी पोशाखातील नंदिध्वज धारक सिद्धरामेश्वरांची आकर्षक मूर्ती भेट देण्यात आली. तसेच शाल, पुष्पगुच्छ अर्पण करून त्यांचा सन्मान करण्यात आला यावेळी बोलताना नामदार बावनकुळे यांनी सोलापूरच्या सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेचे कौतुक केले. सोलापूरची सिद्धरामेश्वर यात्रा ही राज्याच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक आहे. समाजातील एकोप्याची भावना जपणारे असे उपक्रम प्रेरणादायी आहेत, असे मनोगत त्यांनी व्यक्त केले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र कोठे, भाजपाच्या ज्येष्ठ नेत्या तथा माजी महापौर श्रीकांचना यन्नम, सचिन उर्फ अक्षय जाधव यांच्यासह भाजपा नगरसेवक पदाधिकारी कार्यकर्ते आणि ईच्छा भगवंताची परिवाराचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# 'पैशांचा पाऊस पाडतो' म्हणत लाखोंची फसवणूक

## आढेगावच्या भोंदू महाराजांसह भावाला टेंभुर्णी पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** 'आर्थिक अडचण दूर करतो, पैशांचा पाऊस पाडतो' असे आमिष दाखवत अघोरी विधीच्या नावाखाली लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या आढेगाव येथील भोंदू महाराजासह त्याच्या भावाला टेंभुर्णी पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून अंधश्रद्धेच्या नावाखाली सुरू असलेल्या फसवणुकीचा पदार्फाश झाला आहे.

याबाबत फिर्यादी निलेश बाळासाहेब भोईटे (वय 32, रा. लक्ष्मी टाकळी, ता. पंढरपूर) यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. फिर्यादींची सोशल मीडियाच्या माध्यमातून फेब्रुवारी 2024 मध्ये आरोपी नाना विरकर उर्फ गुरुमाऊली व विकास विरकर (रा. आढेगाव) यांच्याशी ओळख झाली होती. आर्थिक अडचणीत असलेल्या फिर्यादीला आरोपींनी मौजे आढेगाव येथील त्यांच्या मठात बोलावले.

तेथे महाराज उर्फ नाना गुरुमाऊली यांनी फिर्यादींचा आधार क्रमांकावरून पॅनकार्ड क्रमांक अचूक सांगून त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर 'तुमची आर्थिक अडचण दूर करतो, पैशांचे मार्ग खुले करतो'



असे सांगत विविध वस्तू दिल्या. मात्र कोणताही फायदा झाला नाही. उलट अघोरी विधी करण्याच्या नावाखाली वेळोवेळी मोठी रक्कम उकळण्यात आली.

यानंतर आरोपींनी फियार्दीला 'नव शिव सह्याद्री ॲग्रो फार्म लिमिटेड' या कथित कंपनीत भागीदार करतो, असे आमिष दाखवून बनावट कागदपत्रे दिली. काही दिवसांनी संबंधित कंपनी अस्तित्वात नसल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने आरोपींकडे पैशांची मागणी केली असता त्याला धमकावण्यात आले.

या प्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक 326/2026 नुसार भारतीय न्याय संहिता कलम 338 सह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी कृत्यांना प्रतिबंध अधिनियम तसेच भारतीय वन्यजीव संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हा दाखल होताच टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तथा परी सहाय्यक पोलीस अधीक्षक राहुल आत्राम यांनी स्वतः तपासात सहभाग घेत दोन विशेष पथके तयार केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी रात्रीत शोधमोहीम राबवत आरोपी

1. पांडुरंग उर्फ नाना उर्फ माऊली महाराज बापूराव विरकर (वय 22) 2. विकास बापूराव विरकर (वय 25, रा. विरकर वस्ती, वडोली ता. माढा) यांना 8 मे 2026 रोजी अटक केली.

दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने 13 मे 2026 पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सागर गायकवाड करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, सहाय्यक पोलीस अधीक्षक अंजना कृष्णा मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली परी सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा प्रभारी अधिकारी राहुल आत्राम, पोलीस उपनिरीक्षक सागर गायकवाड, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विलास रणदिवे, पोलीस हवालदार संदीप गिरमकर, संतोष पाटेकर, सुरज मुलानी, संदीप साखरे यांच्या पथकाने केली.

# सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयामध्ये छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** 14 मे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी त्याचबरोबर छत्रपती संभाजी महाराज यांच्या दैदीप्यमान इतिहास शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये समाविष्ट करण्यात येऊन सर्वच शासकीय निमशासकीय शाळा महाविद्यालयांमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात यावे अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने माननीय जिल्हाधिकारी यांच्यामार्फत निवेदन व ईमेलद्वारे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे.

उपजिल्हाधिकारी देशमुख साहेब यांनी संभाजी ब्रिगेडच्या निवेदनाची तात्काळ दाखल घेत आज तातडीने सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयात जयंती



साजरी करण्यात यावी असे परिपत्रक काढण्यात येईल अशी माहिती दिली.

महाराष्ट्र शासनाच्या प्रशासन विभागाच्या वतीने सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये 14 मे रोजी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करणे बंधनकारक आहे असे असताना देखील अनेक शासकीय कार्यालय व निमशासकीय कार्यालय मध्ये छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली नाही अनेक कार्यालयांमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांची प्रतिमा सुद्धा उपलब्ध नाही केवळ लोकसहभागातून नव्हे तर प्रशासकीय पातळीवर सुद्धा छत्रपती संभाजी महाराजांचे विचार पोहोचावेत त्यामुळे आपण सोलापूर विभागातील सर्व शासकीय निमशासकीय कार्यालय शाळा महाविद्यालय यांना छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त कार्यालयात अभिवादन करण्याचे आदेश द्यावेत अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे माजी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष आम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मीनल दास उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष विक्रम वानकर जिल्हा संघटक विशाल साळुंखे एडवोकेट हर्षवर्धन बोधले योगेश शेंद्री प्रशांत चौरे मिलिंद मस्के समाधान गावडे, गणेश स्वामी अभि बंडगर आकाश भोसले जीवन साळुंखे आदी उपस्थित होते.

# महसूल विभागाकडून चळे व तुंगत मंडळात 1 हजार 526 दाखले, सेवांचे वितरण - तहसीलदार सचिन लंगुटे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर महसूल विभागाशी संबंधित नागरिकांची प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी महसूल विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे राबविण्यात येत आहे. या अभियानातंर्गत आज दिनांक 14 रोजी पंढरपूर तालुक्यातील चळे व तुंगत मंडळातून 1 हजार 526 विविध सेवा व विविध दाखले देण्यात आले असल्याची माहित तहसीलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

या अभियानातंर्गत चळे व तुंगत येथील शिबिरात निकाली काढण्यात आलेले फेरफार 108, सातबारा मधील दुरुस्ती 16, डिजिटल सातबारा 384, 8 अ उतारे 312, प्रमाणपत्रे 469, एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत





निकालात काढण्यात आलेले अर्ज 05, भूसंपादन प्रकरणी कमी-जास्त पत्रके तयार करून गाव दप्तर अद्यावत करण्यात आलेली प्रकरणे 17, अद्यावत अभिलेख 59, वर्ग दोन जमिन वर्ग एक करण्याबाबत कार्यवाही 16, सामाजिक योजना 49, शिधापत्रिका 11, कृषी यांत्रिकीकरण, फलोत्पादन व कृषी सिंचन योजना 50, आभा कार्ड एच.बी, तपासणी व औषधोपचार 20, ई- मोजणी फेरफार नकाशा 10 आदी सेवा व दाखले देण्यात आले.

यामध्ये चळे मंडळातून 731 तर तुंगत मंडळातून 795 असे एकूण 1 हजार 526 विविध सुविधा एकाच छताखाली पुरवण्यात आल्याचे तहसीलदार सचिन लंगुटे यांनी सांगितले. पंढरपूर तालुक्यातील संबधीत मंडळातील जास्तीत जास्त नागरिकांनी या महाराजस्व समाधान शिबिर मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार लंगुटे यांनी केले आहे.

यावेळी आमदार अभिजीत पाटील,जि.प.सदस्य गितांजली साळुंखे, पं.स.सदस्य अतुल गायकवाड, सरपंच ज्ञानेश्वर शिखरे, अमृता रणदिवे, प्रांताधिकारी सचिन इथापे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन हरीश गायकवाड, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, दीपक शिंदे आदीसह मंडळाधिकारी, तलाठी, ग्रामस्थ उपस्थित होते.

# संत शिरोमणी श्री सावता महाराज मंदिराचे डिझाईन आठ दिवसात अंतिम करावे - पालकमंत्री

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** अरण येथील संत शिरोमणी श्री सावता महाराज यांच्या स्मारकासाठी राज्य शासनाने 150 कोटीचा निधी मंजूर केला असून त्यातील 89 कोटीच्या निधीला प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. त्या अनुषंगाने प्रशासनाने टेंडर प्रक्रिया सुरू करावी. तसेच मंदिराचे डिझाईन पुढील आठ दिवसात अंतिम करावे, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित संत शिरोमणी श्री सावता महाराज स्मारक तसेच जगद्गुरु महात्मा बसवेश्वर स्मारक आढावा बैठकीत पालकमंत्री श्री. गोरे बोलत होते. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, आमदार सचिन कल्याणशेट्टी,



आमदार समाधान आवताडे, जिल्हाधिकारी कार्तिकियेन एस., मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी श्रीकांत कुंटला, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, माढा प्रांत अधिकारी जयश्री आव्हाड, मंगळवेढा प्रांत अधिकारी अमित माळी यांच्या सह अन्य अधिकारी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री श्री गोरे म्हणाले की, संत शिरोमणी श्री सावता महाराज मंदिरासाठी आवश्यक असलेल्या जागा खरेदीला शासनाकडून दहा कोटींचा निधी प्राप्त झालेला आहे. त्या अनुषंगाने प्रशासनाने जागा खरेदीची कार्यवाही तात्काळ सुरू करावी. त्यानंतर अनुषंगिक कामाचे टेंडर प्रक्रिया करावी. येथे मंदिर हा मुख्य विषय असून याविषयी कोणत्याही प्रकारची तडजोड केली जाणार नाही, त्यामुळे मंदिराचे डिझाईनही खूप सुंदर, आकर्षक तसेच मोठ्या जागेचे असावे, असे त्यांनी निर्देशित केले.

मंगळवेढा येथे नियोजित जगद्गुरु महात्मा बसवेश्वर यांच्या स्मारकासाठी प्रशासनाची 15 एकर जागा उपलब्ध करून देण्यात येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या 15 एकर जागेवर भव्य स्मारक तसेच तलाव सुशोभीकरणसाठी आवश्यक निधीची मागणी करावी. त्याप्रमाणेच मंगळवेढा शहरात चोखामेळा समथार्साठी किमान दोन एकर पेक्षा अधिक जागा उपलब्ध होत असेल तर त्या जागेची पाहणी जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी व आमदार यांनी करावी, अशा सूचनाही पालकमंत्री गोरे यांनी दिल्या.

# पोलीस, महाराष्ट्र शासन अशा नियमबाह्य पाटी लावलेल्या खाजगी वाहनांवर कारवाई होणार का?

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासन अथवा पोलिस खात्याशी काहीही संबंध नसणारे अनेकजण आपल्या खाजगी वाहनात समोरच्या बाजूला पोलिस अधिकाऱ्याची कॅप व पोलिस, महाराष्ट्र शासन, न्यायाधीश, आर्मी, आमदार, खासदार, नगराध्यक्ष, सरपंच, प्रेस या प्रकारच्या पाटी ठेवून वाहन चालवितात. तसेच पोलिस अधिकारी, कर्मचारी, अंमलदार आणि त्यांचे नातेवाईक हे त्यांच्या खासगी वाहनांवर पोलिस नावाची लाल रंगाची पाटी लावून वाहन चालवितात. त्याचबरोबर

महसुल कर्मचारी, शासन दरबारी काम करणारे अधिकारी, कर्मचारी हे देखील आपल्या खाजगी वाहनावर महाराष्ट्र शासनाची पाटी लावून फिरतात त्यामुळे अशा वाहनांवर व वाहनचालकांवर योग्य ती कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. अशा अनेक गाड्या सोलापूर जिल्ह्यासह तालुक्यात फिरताना दिसतात नाकाबंदी दरम्यान वाहतूक पोलीस अधिकारी कर्मचारी अशा वाहनांना पोलिस, महाराष्ट्र शासन, न्यायाधीश, आर्मी, आमदार, खासदार, नगराध्यक्ष, सरपंच, पोलीस, प्रेस अशा प्रकारे पाटी लावलेली वाहने सुरक्षा तपासणी न होता सोडली जाण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे याचा गैरवापर होऊन नागरिकांच्या





> मोटर वाहन कायद्यानुसार खासगी वाहनांवर पोलिस, वकील, डॉक्टर, खासदार, आमदार, नगरसेवक, नगराध्यक्ष, सरपंच, न्यायाधीश, प्रेस, महाराष्ट्र शासन, राज्य सरकार, राज्य शासन, केंद्र सरकार, केंद्र शासन, केंद्र शासन उपक्रम अशा प्लेट लावणे नियमबाह्य असल्याने आम्हास निदर्शनास येणाऱ्या अशा अनेक वाहनांवर आम्ही कारवाई केली आहे. तसेच सोलापूर ग्रामीण जिल्हा हद्दीतील सर्व पोलीस स्टेशन, पोलीस ठाणे येथील वाहतूक विभाग प्रमुख यांना ज्या खाजगी वाहनांवर नियमबाह्य प्लेट लावल्या आहेत अशा वाहनांवर कारवाई करण्यासाठी आदेश पत्र काढून पाठवले आहे. त्यामुळे खाजगी वाहनांवर नियमबाह्य प्लेट लावल्या असतील तर ती त्वरित काढून टाका. अन्यथा अशा वाहनावर व वाहन धारकावर कारवाई होऊन दंड आकारला जाऊ शकतो. त्यामुळे सर्व वाहनधारकांनी वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळावे असे आवाहन सोलापूर ग्रामीण वाहतूक पोलीस शाखेकडून करण्यात येत आहे.
>
> **- बाळासाहेब भरणे**
> वाहतुक पोलीस निरिक्षक सोलापूर ग्रामीण

जिवाला धोका होऊ शकतो. किंवा मोठा अनुचित प्रकार घडू शकतो.

मोटर वाहन कायद्यानुसार खासगी वाहनांवर पोलिस, वकील, डॉक्टर, खासदार, आमदार, नगरसेवक, नगराध्यक्ष, सरपंच, न्यायाधीश, प्रेस, महाराष्ट्र शासन, राज्य सरकार, राज्य शासन, केंद्र सरकार, केंद्र शासन, केंद्र शासन उपक्रम अशा प्लेट लावणे नियमबाह्य आहे. तरीही अनेक वाहन चालक-मालक सर्रासपणे अशा पाट्या खासगी वाहनांच्या दर्शनी भागात लावताना दिसून येतात.बेकायदेशीर पाट्या लावून दररोज अनेक वाहने रस्त्यावर धावताना दिसतात.पण लावलेली पाटी कायदेशीर आहे की बेकायदेशीर, याची खात्री पोलीस प्रशासनाकडून अथवा प्रादेशिक परिवहन विभागाकडून करण्यात येत नाही. परिणामी प्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी अथवा वाहतूक पोलीस अधिकारी कर्मचारी यांनी अश्या वाहनावर वेळीच कारवाई केली नसल्याने अशा नियमबाह्य पाटी लावणाऱ्या वाहनांची वाढ होताना दिसून येत आहे.खासगी वाहनांवर पोलिस किंवा महाराष्ट्र शासन यासह अन्य नावांच्या पाट्या लावणाऱ्यांवर कारवाई करण्याची तरतूद मोटार वाहन कायद्यात आहे. मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १७७ चे उल्लंघन ठरते .परंतु अशा वाहनांकडे अनेक वेळा जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याने अशा पाटी लावून रस्त्यावर फिरणाऱ्या वाहनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे अनेक ठिकाणी पहावयास मिळत आहे.अनेक वाहन चालक-मालक पोलिसांकडून आपलं वाहन अडवलं जाऊ नये अथवा पार्किंग ठिकाणी किंवा टोल नाक्यावर अडवणूक होऊ नये या हेतूने वाहनांवर शासनाच्या नावाच्या अथवा इतर प्रकारच्या पाट्या लावल्या जातात. व रस्त्यावर रुबाब आणतात. त्यामुळे अशा वाहनांवर त्वरित कारवाई करावी अशी मागणी अनेक नागरिकांकडून होत आहे.